महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३४४ वा | दिनांक : २८/११/२०२५ | वार : शुक्रवार

## दमदाटी करून चालत नाही, प्रत्येकाचा फुगा फुटतो : अजित पवारांचा राजन पाटलांवर हल्ला



**मुंबई** : मोहोळ तालुक्यातील अनगर नगरपंचायतीत गेल्या काही दिवसांपासून राजकीय वातावरण तापले होते. अनेक वर्षांपासून या नगरपंचायतीवर राजन पाटील यांचे वर्चस्व होते. ते राष्ट्रवादीतून भाजपमध्ये गेले आणि त्यानंतर परिस्थितीत मोठा बदल झाल्याचे दिसून आले. सत्ता कायम ठेवण्यासाठी विविध राजकीय हालचाली घडत होत्या. म्हणूनच १७ जागा बिनविरोध करून दाखवणाऱ्या पाटील यांची ताकद दाखवली. मात्र, नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीतच नवा संघर्ष उभा राहिला. राजन पाटलांची सून उमेदवार असताना, अजित पवार गटाकडून उज्वला थिटे यांना उमेदवारी देण्यात आली. यानंतर गावात दडपशाही, धमकी यांसारख्या घडामोडी घडल्याच्या चर्चा चांगल्याच रंगल्या. उज्वला थिटे यांचा अर्ज तांत्रिक कारणावरून बाद केला गेला आणि या वादाची ठिणगी आणखी भडकली.

उज्वला थिटे यांनी या निर्णयाला कोर्टात आव्हान दिले मात्र, न्यायालयानेही याचिका फेटाळली. तरीही त्या माघार घेण्याच्या मूडमध्ये नव्हत्या. त्यांनी लढा सुरूच राहील, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली. त्यानंतर हा मुद्दा सोलापूरच्या वडाळा भागातील कार्यक्रमात गाजला. त्या कार्यक्रमात अजित पवार यांनी उज्वला थिटे यांचा सत्कार करून त्यांना मजबूत पाठबळ दिले. यावेळी त्यांनी कोणाचेही नाव न घेता, राजन पाटील यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. लोकशाहीमध्ये सर्वांना निवडणूक लढण्याचा अधिकार आहे, दमदाटी करून काही चालत नाही, प्रत्येकाचा फुगा एके दिवशी फुटतो, मस्ती दाखवणाऱ्यांना लोक खड्यासारखे बाजूला फेकतात, अशा कठोर शब्दांत त्यांनी टीका केली आहे.

महिला सोनं करतात, त्यांना संधी मिळाली पाहिजे, म्हणत अजित पवार यांनी उज्वला थिटे यांच्या पाठिशी ठाम उभे राहण्याचा संदेश दिला. आपल्या लाडक्या बहिणी इथे आहेत, त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सन्मानासाठी आम्ही आहोत्र, असे म्हणत त्यांनी आगामी राजकीय लढाईची दिशा सूचित केली. महिलांसाठीच्या योजनांची माहिती देताना, महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी लाडकी बहिणी योजना सुरू केली. संपूर्ण राज्यात लाखो महिलांना त्याचा फायदा निश्चित होणार आहे, असे ते म्हणाले. त्यांच्या भाषणात महिलांचा सन्मान, हक्क आणि राजकारणातील सहभाग या मुद्द्यांवर विशेष भर होता.

## मुस्लीम मतांवर निवडणूक जिंकता येईल म्हणून उबाठा काही बोलत नाही- नवनाथ बन



**मुंबई** : उबाठाच्या नेते वरळीतील दुबार मतदारांवर बोलत नाही. मुंबई मनपाच्या तोंडावर मुस्लीम मतांच्या जीवावर आपल्याला सत्ता काबीज करता येईल हा उबाठाचा डाव आहे. किशोरी पेडणेकर यांच्याकडे ही यादी असताना त्यावर बोलत का नाही? आदित्य ठाकरे वरळीतील मुस्लीम मतदारांनी तुम्हाला मतदान केले म्हणून तुम्ही आमदार झालात का? असा सवाल भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी केला आहे. नवनाथ बन म्हणाले की, आदित्य ठाकरेंच्या मतदारसंघात जर २० ते २२ हजार दुबार मतदार आहेत त्यांच्याच मतदानावर तुम्ही निवडून आले आहात का? आदित्य ठाकरेंनी आधी राजीनामा द्यावा आणि मग दुबार मतदारांबद्दल शंका व्यक्त करावी. या दुबार मतदारांमुळेच आदित्य ठाकरे निवडून आले आणि संदीप देशपांडे यांचा पराभव झाला. त्यामुळे मनसेने वरळीमध्ये लक्ष घालावे.

नवनाथ बन म्हणाले की, आदित्य ठाकरे यांची महाराष्ट्रातील पॉवर जनतेने आधीच कट केलेली आहे. आता त्यांच्याच हिंमत असेल तर राजीनामा देत दुबार मतदानाला सामोरे जातील. पेडणेकरांचे नाव दोनदा कसे आले? तुम्हाला फायदा व्हावा म्हणून तर तुम्ही नाव दोनदा नोंदवले नाही ना? सर्वांची दुबार नावे हटवली पाहिजे. किशोरी पेडणेकर यांनी मुस्लीम नावाबद्दल चकार शब्द काढला नाही? जाणीवपूर्वक हिंदू मतदारांना टार्गेट करण्याचे काम उबाठाकडून केले जात आहे.

नवनाथ बन म्हणाले की, उबाठाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांचे दुबार मतदारांमध्ये नाव आहे. म्हणून त्यांनी निवडणूक आयोगावर टीका केली आहे. ठाकरे गटाकडून हिंदू दुबार मतदारांवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. उबाठा मुस्लीम दुबार मतदारांवर बोलायला तयार नाही. वरळीत मोठ्या प्रमाणात दुबार मतदार आहेत. मुस्लीम मत मिळावे म्हणून हे त्यांच्यावर काही बोलत नाही. किशोरी पेडणेकर यांनी काल एकही नाव घेतले नाही.

## करुणा मुंडे पोटगी प्रकरणी तडजोडीसाठी मध्यस्थ नेमले



**छत्रपती संभाजीनगर** : माजी मंत्री धनंजय मुंडे आणि करुणा मुंडे यांच्यातील पोटगी प्रकरण हे कौटुंबिक स्वरूपाचे असल्याने ते तडजोडीने मिटू शकते, असे मत दोन्ही बाजूंच्या वकिलांनी मुंबई उच्च न्यायालयात मांडले आहे. यानुसार, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार यांनी या प्रकरणात मध्यस्थ म्हणून न्यायमूर्ती अनुजा प्रभु देसाई यांची नियुक्ती केली आहे.

न्या. माधव जामदार यांनी आदेश दिले की, न्या. अनुजा प्रभु देसाई यांनी चार आठवड्यांत, म्हणजेच १६ जानेवारी २०२६ पर्यंत, आपला अहवाल न्यायालयात सादर करावा. तसेच, मध्यस्थांशी संबंधित कार्यवाहीचा सर्व खर्च व शुल्क याचिकाकर्ता धनंजय मुंडे यांनीच करावा, असेही आदेश पत्रात नमूद आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २० जानेवारी २०२६ रोजी होणारआहे.

माजी मंत्री धनंजय मुंडे यांना यापूर्वी बांद्रा न्यायालयाने करुणा मुंडे यांना दोन लाख रुपयांची पोटगी, शिवाय २५ हजार रुपये आणि मुलीसाठी ७५ हजार रुपये देण्याचे आदेश दिले होते. माजगाव जिल्हा सत्र न्यायालयानेही हेच आदेश कायम ठेवले.

या आदेशांवर नाराजी व्यक्त करत धनंजय मुंडे यांनी मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी याचिका दाखल केली होती. मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. माधव जामदार यांच्या पीठासमोर ही याचिका सुनावणीस निघाली होती. ॲड.चंद्रकांत ठोंबरे यांनी करुणा मुंडे यांची बाजू मांडली, तर ॲड. सायली सावंत यांनी धनंजय मुंडेंकडून काम पाहिले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ नोव्हेंबर २०२५


# पालकसभा आणि आनंद नगरीचे आयोजन



**वैजापूर :** जि. प. प्रा. शाळा रघुनाथपूरवाडी ता. वैजापूर जि.छ संभाजीनगर येथे जिल्हाधिकारी श्री स्वामी साहेब यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या दशसुत्री कार्यक्रमांतर्गत "पालकसभा" आयोजित करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, पालक, आजी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी ताई माजी विद्यार्थी विद्यार्थिनी आणि प्रतिष्ठित गावकरी व माता भगिनी हे सर्व उपस्थित होते..यावेळी बदलत्या काळानुसार दशसुत्री या मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांना 'कमवा आणि शिका' या तत्त्वाची जाणीव करून देणे तसेच विविध व्यवसायांची आणि व्यवहारांची माहिती देण्याच्या उद्देशाने शाळेत "बाल आनंदनागरी" आयोजित करण्यात आली होती..! यावेळी शाळेतील सर्व भावी चिमुकल्या व्यावसायिकांनी आपली छोटी - छोटी स्टॉल कल्पक बुद्धीने नावे देऊन लावली होती..! शाळेच्या परिसराला छोट्याखाणी जत्रेच स्वरूप आनंद नगरीमुळे आले होते..! पालक सभेच्या निमित्ताने जमलेल्या सर्व माय-बाप पालकांनी येथेच्छ खरेदी करून चिमुकल्यांचा आनंद द्विगुणित केला. याप्रसंगी रामेश्वर पवार या यांनी शाळेकरिता एलईडी टीव्ही संच भेट देण्याचे जाहीर केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक साईनाथ कवार, शिक्षक संजय जाधव, भागचंद जाधव, सूर्यकांत फड, श्रीमती जी बी पवार, पी बी राशिनकर व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# बहिरगाव प्रशालेच्या गौरव जाधवचे भजन गायनात उल्लेखनीय यश



**कन्नड (प्रतिनीधी)** - सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सव २०२५ मध्ये जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव ता- कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थी गौरव जाधव याने उत्कृष्ट भजन सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्याच्या प्रभावी सादरीकरणाची दखल घेत आयोजकांनी त्याला चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक जाहीर केले.स्पर्धेत मिळालेल्या या पारितोषिकामध्ये रु. १०००/- रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. हा मानाचा पुरस्कार उपविभागीय पोलिस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री ,प्राचार्य विजय भोसले यांच्या हस्ते गौरव जाधवला प्रदान करण्यात आला.गौरवच्या यशाबद्दल मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप तसेच शिक्षक कुलभूषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी ,दिलीप महाजन, नूतन पवार, श्याम खोसरे, सलीम आतार, राधेश्याम शर्मा, स्वप्निल गांगुर्डे, किरण पाटील, रवींद्र ठाकरे, गणेश बल्लाळ, किसनाबाई गोरे, सुनीता कुंटे आदींनी अभिनंदन केले.

# निपाणी येथील जिजामाता महाविद्यालयात संविधान दिन साजरा



**कन्नड (अरुण थोरात) :** भारतीय संविधान दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन जिजामाता महाविद्यालय निपाणी ता. कन्नड येथे करण्यात येऊन, संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळेस सर्व प्राध्यापक व पालक वर्ग उपस्थित होते. मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी प्रा. आशिष अजमेरा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना, संविधान तयार करणाऱ्या संविधान सभेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी अनेक चर्चा आणि सुधारणेनंतर संविधानाचा स्वीकार केला होता. याच कारणाने २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन म्हणून साजरा करतात. भारतीय संविधान मुल्ले ही नागरिकांच्या प्रगती साठी पोषक असून घटनाकारांना अभिप्रेत असलेली न्याय, समता, बंधुत्वता वाढीस लागण्यासाठी आपण प्रयत्न करु या. शैक्षणिक संधींचे सोने बनवून आपण चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊण, स्वतः बरोबरच देशाचा विकास करुण सर्वांगीण विकास साधण्याचे अवाहन केले. संविधान सभेने संविधान स्वीकारल्यानंतर दोन महिन्यांनी २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू करण्यात आले हे अत्यंत सोप्या आणि मार्मिक भाषेमध्ये उपस्थित विद्यार्थी व पालक वर्गांना सांगून आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. योगेश्वर पवार यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले व प्राचार्य श्री गोंगे यांनी संविधानाचे वाचन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# ह.भ.प. वै. पंढरीनाथ मुंढे स्मृती प्रतिष्ठानतर्फे संगीत महोत्सवाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** ह.भ.प. वै. पंढरीनाथ मुंढे स्मृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित ह.भ.प. वै. पंढरीनाथ मुंढे स्मृती संगीत महोत्सव २०२५ हा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ७ वाजता तापडीया नाट्यमंदिर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.यंदाच्या महोत्सवाची थीम "वो भूली दास्तां... स्वर्णिम युग की सुनहरी यादें" अशी असून, भारतीय संगीताच्या सुवर्णकाळातील अजरामर रचना रसिकांसमोर सादर केल्या जाणार आहेत.कार्यक्रमात ख्यातनाम कलाकारांचे सुरेल सादरीकरणमोहनवीणा वादन - पं. सतीश खानविलकरबासरी वादन - पं. प्रशांत अभ्यंकरया दुर्मिळ वाद्यजुगलबंदीमुळे श्रोत्यांना अद्वितीय संगीतअनुभव लाभणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून मा. दिलीप स्वामी (जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर) उपस्थित राहणार असून, उद्घाटन ह.भ.प. अच्युत महाराज कुलकर्णी यांच्या शुभहस्ते होणार आहे.ह.भ.प. वै. पंढरीनाथ मुंढे स्मृती प्रतिष्ठान व राजेश मुंढे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. आयोजकांनी सर्व संगीतप्रेमींना कार्यक्रमास उपस्थित राहून संगीतप्रेमाचा उत्सव अधिक संस्मरणीय करण्याचे आवाहन केले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ नोव्हेंबर २०२५


## जीवनात एखादी कला अवगत असली पाहिजे - अपराजिता अग्निहोत्री




**कन्नड :** विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच विविध कार्यक्रमात सहभाग घेतला पाहिजे, केवळ अभ्यास करून परिपूर्ण व्यक्तिमत्व घडू शकत नाही. जीवनात एखादी तरी कला माणसाला अवगत असली पाहिजे असे प्रतिपादन कन्नड येथील उपविभागीय पोलिस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री यांनी केले. (ता. २६) येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालय, बाळसाहेब पवार फाऊंडेशन यांच्या वतीने २५ व २६ नोव्हेंबर रोजी सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समारोप व पारितोषिक वितरण कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून त्या उपस्थित होत्या. व्यासपीठावर श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव चंद्रकांतराव देशमुख, डॉ. मिलिंद पाटील, प्राचार्य डॉ. विजय भोसले, रामकृष्ण पवार , परिक्षक प्रा. राहुल शिंदे, प्रा. गणेश दळे, तन्मय अवसरमल यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना त्या म्हणाल्या की कमी वयात विद्यार्थ्यांना हे मोठे व्यासपीठ मिळाले आहे. असे मत व्यक्त केले. ६० संघानी विविध कला प्रकारात सहभाग घेतला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केला. ते म्हणाले की कन्नड तालुक्यात प्रतिभावंत कलावंत सजग विवेकी नागरिक घडावेत या उद्देशाने ही सांस्कृतिक चळवळ मोठे योगदान देत आहेत. प्रास्ताविक व निकाल वाचन संयोजन समितीचे प्रा. डॉ. के. एल. भानुसे , यांनी केले. कार्यक्रमास उद्योजक मानसिंह पवार, चंद्रकांत देशमुख, डॉ. ए.के. महाले, सागर जाधव, राधा कडवकर, प्राचार्य राहुल क्षिरसागर, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, रामकृष्ण पवार रामराव शिंदे, संजय जाधव, डॉ. रुपेश मोरे , डॉ. आर.टी. नागे, प्रा. हुकुमचंद पवार, प्रा. संतोष देशमुख, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे , डॉ. उदय डोंगरे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. संगीत महोत्सवात पारितोषिक प्राप्त विद्यार्थी कलावंताचा सन्मान करण्यात आला. पारितोषीक प्राप्त शाळा पुढील प्रमाणे - समुहगायन प्रथम पारितोषीक - जवाहर नवोदय विद्यालय कन्नड, व्दितीय - तरलनिनाद अकादमी कन्नड, तृतिय - जि. प. प्रशाला विठ्ठलपूर, उत्तेजनार्थ - काशिनाथराव पाटील विद्यालय कन्नड, एकल गायन - एकल नृत्य - प्रथम - सानेगुरुजी माध्यमिक विद्यालय कन्नड, व्दितीय - देवगिरी इंग्लिंश स्कुल कन्नड, तृतिय - ए.एन.आय. स्मार्ट स्कुल पांडवनगरी, उत्तेजनार्थ - जि. प. प्रा. शाळा बहिरगाव, समुहनृत्य - प्रथम - ए.एन.आय. स्मार्ट स्कुल पांडवनगरी, व्दितीय - जि. प. प्रशाला . महालपूर, तृतिय - गौताळा व्हॅली स्कूल कन्नड, उत्तेजनार्थ - जि.प. मा. विद्यालय देभेगाव

## अय्युब पठाण यांची दर्जेदार बालसाहित्यांची पुस्तके भेट



**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** बालभारतीच्या पाठयपुस्तकातील प्रसिध्द बाल कवी अय्युब पठाण लोहगावकर यांची दर्जेदार बाल साहित्यांची पुस्तके छत्रपती संभाजीनगर येथील नामवंत वकील तथा विधीतज्ञ श्री. ए. बी. भोसले यांना त्यांच्या कार्यालयात जाऊन अय्युब पठाण लोहगावकर यांनी सन्मानपूर्वक बालसाहित्यांची पुस्तके भेट दिली आहे. यामध्ये " आईचा हात, ज्ञानपोई, कष्टाच्या वाटा, अंगत पंगत, आणि मर्मगंध " या बाल पुस्तकांचा समावेश आहे. या प्रसंगी विधीतज्ञ ए. बी. भोसले यांनी पुस्तके नम्रपणे स्विकारून बाल कवी अय्युब पठाण लोहगावकर यांना आशिर्वाद देऊन त्यांना पुढील साहित्य लेखनास शुभेच्छा दिल्या.

## प्रत्येक झाडाची होत नसते कविता

प्रत्येक झाडाची होत नसते कविता
काही झाडं वाळली तरी
भेटत नसतो त्यांच्या वेदनेला सूर..

काही भोगत असतात
युगानुयुगे झळा उन्हाच्या
चिमण्या पाखरांना अन्
उन्हात शिणलेल्या वाटसरूना
सावली देण्यासाठी..

त्यांच्या फांद्यानी सोडली साथ
तेव्हा पानं ही करू लागतात थरथर
गळण्याआधी..

अन् ते सुकलं की सोडतात
फांद्यावरील पक्षी बांधलेली घरटे
नव्या सोनेरी जगाच्या मोहात
पंखात बळ आलं म्हणून..

अन् इकडं ती झाडं
पाहत असतात वाट
शेवटचा श्वास सरण्याआधी
पाखरांच्या भेटीची..

पण पाखरांनी..
माय माती माणसाबरोबर
कधीचाच सोडला गाव
नव्या जगात रमल्याने..

इकडं ते निघून गेले
पाखरांच्या रस्त्याकडे वाट पाहत पाहत
शेवटच्या प्रवासाला
पण पाखरं आलीच नाही..



**ज्ञानेश्वर गायके**
कन्नड
मो.९४०३३८४८८९

## वांगेराव

वांगेराव वांगेराव
काय तुमचा थाट
तुमच्या भाजीमुळे
सजते आमचे ताट

शोभून दिसते तुम्हाला
काटेरी हिरवी शाल
विळीने चिरतांना मात्र
आईचे होतात हाल

पांढरा, जांभळा,हिरवा
रंग तुझे कितीतरी
तुमच्या भाजी शिवाय
पंगत असते अधुरी

विस्तवात भाजून
भरीत करते आई
जेवतांना जो तो
मिटक्या मारीत खाई

चमचमीत तुमची भाजी
करतो आम्ही फस्त
ढेकर देत म्हणतो
जेवण झाले मस्त



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ नोव्हेंबर २०२५


## भारतीय संविधान हे उपेक्षित, वंचित आणि विस्थापित समाजाच्या उत्कर्षांचा जाहीरनामा - डॉ. संदेश वाघ




**नागपूर (डॉ. चंद्रशेखर पाटील) :** "अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, भटक्या-विमुक्त जाती/जनजाती, महिला, अल्पसंख्यांक, बालके आणि दिव्यांग यांसह सर्व वंचित घटकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात संरक्षणात्मक तरतुदी दिल्या आहेत. या तरतुदींमुळेच समाजातील उपेक्षित घटकांचे सक्षमीकरण व्यापक स्तरावर होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात समाविष्ट केलेले आरक्षण धोरण हे वंचित घटकांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीचे प्रभावी साधन ठरले आहे. त्यामुळे भारतीय लोकशाही अधिक समावेशक आणि न्याय्य बनली आहे."असे प्रबोधन पर विचार मुंबई विद्यापीठाचे इतिहास विभाग प्रमुख तसेच आंबेडकराईट हिस्ट्री असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. संदेश वाघ त्यांनी मांडले. ते डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे संविधान सप्ताहाअंतर्गत " भारतातील वंचित समाजाचे सक्षमीकरण आणि संविधानात्मक तरतुदी ' यावर आयोजित व्याख्यानाचे प्रमुख वक्ता म्हणून बोलत होते.

यावर पुढे बोलताना "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधाना च्या रचनेतून हजारो वर्षांपासून चालत आलेल्या रूढीवादी, वर्चस्व वादी आणि विषमतामुलक सर्व संकल्पना उध्वस्त केल्या. त्यामुळे भारतीय संविधान हे देशातील सर्व वंचित आणि उपेक्षित समाजाच्या उत्कर्षाचा जाहीर नामा आहे." असे परखड विचार त्यांनी मांडले.

या प्रसंगी जागतिक इतिहास समीक्षक, जेष्ठ भाष्यकार डॉ. संदेश वाघ यांचा महाविद्यालयातर्फे शाल आणि सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष पद कार्यकारी प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी भूषविले. या व्याख्याना करिता जेष्ठ इतिहास अभ्यासक आणि आंबेडकरी चळवळीचे विश्लेषक डॉ. ताराचंद्र गेडाम यांची विशेष निमंत्रित म्हणून उपस्थिती होती. याप्रसंगी उप प्राचार्या प्रा. गामिनी मेश्राम, वरिष्ठ महाविद्यालय सांस्कृतीक विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर पाटील यांची ही उपस्थिती होती.

महाविद्यालयाच्या कार्यकारी प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी भारतीय संविधान हे सामाजिक परिवर्तनाचे बलस्थान असून ते प्रत्येक नागरिकासाठी मार्गदर्शक मूल्यप्रणाली आहे असे प्रतिपादन केले. त्यासोबतच संविधानातील विविध तरतुदी, कलमांचा आणि मार्गदर्शक तत्वाचा वैचारिक मागोवा त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाष्यातुन घेतला.

अतिथी व्याख्यान आयोजनामागची प्रमुख भूमिका मांडून अतिथी वक्त्यांचा परिचय सभागृहास डॉ. महेंद्र गायकवाड यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. कमलाकर तागडे यांनी केले. तर मान्यवरांचे आणि उपस्थितांचे आभार डॉ. अमोल दि. मेंढे यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन आणि संयोजन इतिहास विभाग प्रमुख आणि संविधान महोत्सव समितीचे समन्वयक डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी केले. या कार्यक्रमाला वरिष्ठ, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाच्या परंपरेनुसार कार्यक्रमाची सांगता राष्ट्र गीताने संपन्न झाली.

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा देभेगावच्या शिरपेचात मानाचा तुरा



**कन्नड (अरुण थोरात) :** सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सव २०२५ चे आयोजन सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय कन्नड येथे दि. २५-२६ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. या संगीत महोत्सवात जवळजवळ ९० संघांनी सहभाग घेतला होता. त्यात समूहनृत्य, समूहगीत, एकलनृत्य, एकल गायन हे कलाप्रकार सादर करण्यात आले. यामध्ये जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा देभेगाव च्या समूहनृत्याच्या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला. या विद्यार्थिनींना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम १००० रुपये बक्षीस देण्यात आले. या महोत्सवात सर्व माध्यमाच्या खाजगी शाळा तसेच कला अकॅडमी, संगीत अकॅडमी, आणि जिल्हा परिषदेच्या शाळांनी सहभाग घेतला होता. या सर्व विद्यार्थिनींना नृत्य दिग्दर्शन शाळेतील सहशिक्षिका छाया बाळकृष्ण माळवाळ यांनी केले, तर समुह गायनासाठी तबला साथसंगत संजय संतराम जावळे प्रा.प.शि. यांनी केली. या स्पर्धेत देभेगाव च्या विद्यार्थिनींनी क्रमांक पटकावल्याबद्दल शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप शिवनाथ बोडखे, उपाध्यक्ष रवींद्र साहेबराव बोडखे व सदस्य तसेच समस्त गावकऱ्यांच्या वतीने विद्यार्थिनींचे अभिनंदन व कौतुक करण्यात आले. संपूर्ण यशासाठी देभेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख हिरामण सोनवणे, शाळेचे मुख्याध्यापक बी. एस वनारसे, शिक्षक श्री रिंढे, श्री अमृतकर, श्री जोशी, श्री कुमावत, श्री देवकर व श्रीमती बोडखे, श्रीमती गोल्हार, यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

## मनपा केंद्रीय शाळेत रांगोळीमार्फत २६/११ शहीदांना आदरांजली




**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे मूल्यवर्धन प्रशिक्षण (टप्पा—2) अंतर्गत प्रशिक्षण घेणारे श्री. राजेंद्र वाकळे सर (विनायकराव पाटील प्रा.शाळा एन -८, छत्रपती संभाजीनगर) यांनी 26/11 मुंबई हल्ल्यातील शहीदांना रांगोळीच्या माध्यमातून अभिवादन करून आदरांजली अर्पण केली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी उपस्थित होते.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ नोव्हेंबर २०२५

## अभिनव विद्या विहार शाळेत 'चला वाचूया' उपक्रमाने मुलांमध्ये वाचनाची नवी क्रांती





अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळेतील चौथी इयत्तेत मी "चला वाचूया" हा वाचन उपक्रम सुरू केला. हा उपक्रम ठेवण्यामागचा मुख्य उद्देश असा होता की मुलांना पुस्तके वाचण्याची आवड निर्माण व्हावी. आज मुलांचा मोबाईल, टीव्ही आणि गेम्समध्ये वेळ जातो. त्यामुळे पुस्तकांकडे त्यांचे लक्ष कमी होते. म्हणूनच मी विचार केला की काहीतरी वेगळे करावे, जेणेकरून मुले उत्साहाने वाचतील.उपक्रमाचा पहिला दिवस खूप साधा होता. मी मुलांशी बोललो आणि त्यांना विचारलो — तुम्हाला कोणत्या प्रकारची पुस्तके आवडतात? कथा? गोष्टी? चित्रे असलेली पुस्तके? किंवामहापुरुषांवरची पुस्तके?मुलांनी आपापल्या आवडी सांगीतल्या. त्यानुसार मी ग्रंथालयातून सोपी आणि छान पुस्तके त्यांच्या हातात दिली. सुरुवातीलाच मी त्यांना सांगितलो.आपण पुस्तकाला आपला मित्र बनवायचा आहे. घाई नको, थोडं थोडं वाचलं तरी चालेल.पहिले काही दिवस मुलांना वाचण्यात थोडी अडचण आली. काही मुलांना शब्द जड वाटत होते. काही मुले पटकन कंटाळत होती. पण मी त्यांना प्रोत्साहन दिलो. त्यांना मी सांगितलो की वाचन म्हणजे स्पर्धा नाही, तर आनंद आहे. सुरुवातीलाच मोठी किंवा कठीण पुस्तके वाचायची गरज नाही. अगदी 5—6 पानांचं छोटं पुस्तक वाचलं तरी चांगलंच. हळूहळू मुलांच्या वाचनात सुधारणा व्हायला सुरुवात झाली. ते पुस्तक उघडून वाचायला लागले. काही मुलांनी तर दर आठवड्याला एक पुस्तक पूर्ण केले. काही मुलांनी तर 20—25 पुस्तके वाचल्याचे मला त्यांनी अभिमानाने सांगितले. एवढी पुस्तके वाचणे ही त्यांच्या मेहनतीची आणि आवडीची पावती होती. वाचनामुळे मुलांमध्ये खूप सुंदर बदल दिसू लागले.पहिला बदल—त्यांचे बोलणे सुधारले.ज्यांना आधी नीट वाक्य बोलता येत नव्हते, ते आता गोष्ट छानपैकी सांगू लागले. त्यांचा शब्दसंग्रह वाढला. त्यांना नवीन शब्द समजू लागले. काही मुलांनी तर स्वतःहून मित्रांना गोष्टी सांगायला सुरुवात केली.दुसरा बदल—एकाग्रता वाढली.वाचनासाठी शांत बसावे लागते. त्यामुळे मुलांचे लक्ष वाढले. ते धड्यातही लक्ष देऊ लागले. जे मुलं पूर्वी पाच मिनिटेही शांत बसत नव्हती, ती आता शांतपणे पुस्तक वाचत बसू लागली.तिसरा बदल—कल्पनाशक्ती वाढली.कथा वाचताना ते त्यांच्या मनात चित्रं बनवत. गोष्टीतील पात्रे त्यांना आपलीच वाटू लागली. काहीजण चित्रं काढू लागले. काहीजण स्वतः छोट्या गोष्टी लिहू लागले. या गोष्टींनी मला जाणवले की मुलांमध्ये खूप क्षमता आहे, फक्त तिला जागं करण्याची गरज होती."चला वाचूया" उपक्रमामुळे फक्त शाळेतच नाही, तर घरीही बदल दिसू लागले. मुलांनी घरी जाऊन आई-बाबांना गोष्टी सांगायला सुरुवात केली. काही पालकांनी मुलांसोबत पुस्तक वाचायला सुरुवात केली. त्यामुळे घरात छान शांत वातावरण तयार झाले. काही पालकांनी मला सांगितले की मुलांचा मोबाईलवरचा वेळ कमी झाला आहे. हे ऐकून मला खूप आनंद झाला.या उपक्रमात आम्ही काही मजेशीर गोष्टीही केल्या.- वाचलेल्या पुस्तकावर छोटी प्रतिक्रिया लिहिणे.- आवडती गोष्ट वर्गात सांगणे.- पुस्तकातील प्रसंगावर चित्र काढणे.- एखाद्या महापुरुषाबद्दल छोटा परिचय सांगणे.या छोट्या उपक्रमांमुळे मुलांचा आत्मविश्वास वाढला. बोलणे सुधारले. लेखन सुधारले. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांना पुस्तकांवर प्रेम बसले.या उपक्रमामुळे मुलांचे आयुष्य खरंच बदलत आहे असं मला जाणवायला लागलं. पुस्तक वाचताना त्यांना काहीतरी नवीन शिकायला मिळते.कधी एखादी शिकवण मिळते.कधी एखादी मजेशीर गोष्ट मनाला आनंद देते.कधी एखाद्या महापुरुषाची कथा त्यांना प्रेरणा देते.वाचनामुळे मुलांचा विचार करण्याचा वेग वाढतो. ते प्रश्न विचारतात. गोष्टींचा अर्थ लावतात. स्वतःच्या कल्पना सांगतात. हे सर्व बदल पाहताना मला खूप समाधान मिळतो.आज "चला वाचूया" उपक्रम म्हणजे फक्त पुस्तक वाचण्याचा कार्यक्रम राहिलेला नाही. तो मुलांसाठी आनंदाचा, शिकण्याचा आणि ज्ञान वाढण्याचा सुंदर मार्ग बनला आहे.प्रत्येक आठवड्याला नवं पुस्तक मिळण्याची त्यांना आतुरता असते. ते पुस्तकांना आता मित्रासारखे जपतात.वाचनामुळे त्यांच्या मनात चांगले विचार,शिकण्याची सवय,सकारात्मक दृष्टी,आणि सुंदर संस्कार तयार होत आहेत. हा उपक्रम माझ्यासाठी आणि मुलांसाठी खूप खास आहे. कारण या उपक्रमाने मुलांमध्ये वाचनाची खरी गोडी निर्माण केली आहे. ही गोडी पुढेही त्यांना आयुष्यात मदत करणार आहे. खरं तर वाचन ही अशी सवय आहे जी आयुष्यभर माणसाला साथ देते. वाचनातून माणूस मोठा होतो.ज्ञानानेही आणि विचारानेही. म्हणूनच मला वाटते—"चला वाचूया" हा छोटा उपक्रम नसून, मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोठी पायरी आहे.

**विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड**
अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळा,
पूर्णा ता. पूर्णा जि.परभणी
9096075630

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

## आयसर च्या आयराइज प्रकल्पांतर्गत जिल्यांतील शिक्षकांनी जाणल्या विज्ञान गणितातील विविध क्लृप्त्या




**पुणे :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व इंडियन इन्स्टिटय़ूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च (आयसर), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय विज्ञान आणि गणित शिक्षक प्रशिक्षण उत्साहात संपन्न झाले. डायट चे प्राचार्य डॉ.आर.डी. कांबळे, यांच्या मार्गदर्शनात विज्ञान विभाग प्रमुख श्रीमती सुजाता भालेराव यांनी कार्यशाळेचे नियोजन केले. भारत सरकार आयसर पुणे, ब्रिटिश कौन्सिल, रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री, टाटा टेक्नॉलॉजीज आणि टाटा ट्रस्टस् यांच्या संयुक्त विद्यमाने संचलित आयराईज (iRISE) टीचर डेव्हलमेंट स्ट्रॅन्ड च्या तिसऱ्या टप्प्यातील २५ ते २७ नोव्हेंबर दरम्यान तीन दिवसीय कॅस्केड प्रशिक्षण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, छ.संभाजीनगर येथे संपन्न झाले.आयसर च्या आयराईज (iRISE) उपक्रमांतर्गत शिक्षकांना विज्ञान गणित अध्ययन अध्यापनाच्या विविध पद्धती,नवोपक्रम,इन्स्पायर मानक शैक्षणिक आशयज्ञान इ.बाबतीत हे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.या तीन दिवसीय प्रशिक्षणामध्ये राज्य सुलभक तथा इनोव्हेशन चॅम्पिअन्स- श्रीमती सारीका जैन,श्री सुहास पाटील,जमील शेख आणि श्री विनीत देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.सुहास पाटील यांनी भौतिकशास्त्र विषयातील विविध संकल्पना कीटमधील साहित्याद्वारे स्पष्ट केल्या. श्रीमती सारीका जैन यांनी कबाड़ से जुगाड़ करत प्रयोगशाळेतील विविध उपकरणे लो कॉस्ट आणि झिरो कॉस्ट साहित्य वापरुन तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. जमील शेख यांनी आयडिया बॉक्स आणि इन्स्पायर मानक याविषयी माहिती सांगितली तर विनीत देशपांडे यांनी गणितातील विविध संकल्पना मॉडेल्स द्वारे स्पष्ट केल्या.प्रशिक्षणामध्ये दैनंदिन अध्यापनात उपयुक्त स्टोरी ,पिक्चर प्रॉम्प्ट, डी.आय.वाय. मॉडेल मेंकींग ई. अध्यापनशास्त्रीय पद्धती विषयी मार्गदर्शन करण्यात आले. आयसर च्या आयराईज टीम तर्फे प्रशिक्षण विभाग प्रमुख जहीदा शेख आणि नजीला मॅडम यांनी मार्गदर्शन तसेच प्रशिक्षणार्थीसाठी किट ई.व्यवस्था केली.या कार्यक्रमाचे उद्‌घघाटन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ.आर.डी.कांबळे, वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ.संजय येवते यांनी आणि प्रास्ताविक श्रीमती सुजाता भालेराव यांनी केले. जिल्हाभरातील गणित व विज्ञान विषयाच्या साठ शिक्षकांनी या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग नोंदवला.सर्व सहभागी शिक्षकांना संस्थेचे प्राचार्य सन्माननीय डॉ.आर.डी. कांबळे, वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ.संजय येवते, सानवी देशमुख, डॉ.मंजुषा क्षिरसागर, डॉ.चौधरी, नितीन जाधव सुजाता भालेराव तसेच मान्यवरांच्या हस्ते सुलभकांना ॲप्रिसिएशन प्रमाणपत्र तसेच सहभागींना प्रमाणपत्रे देण्यात आली.

## महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त व्याख्यानमालेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** मराठवाडा शिक्षक संघ छत्रपती संभाजी नगर तर्फे दिनांक 29 नोव्हेंबर 2025 रोजी महात्मा गांधी भवन विभागीय ग्रंथालयाजवळ सावरकर चौक छत्रपती संभाजीनगर येथे संध्याकाळी पाच व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. उमाकांत राठोड सर अधिसभा सदस्य डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर. उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी व्याख्यानमालेतील प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ विचारवंत व लेखक प्रा. श्री प्रल्हाद लुलेकर आणि श्री एम के देशमुख माजी. शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी हे महात्मा फुले यांच्या जीवनावर आणि शैक्षणिक क्षेत्रातील टीईटी ची सद्यस्थिती याबाबतीत मार्गदर्शन करणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन मराठवाडा शिक्षक संघ छत्रपती संभाजीनगर चे (जिल्हा सचिव) भाई चंद्रकांत चव्हाण यांनी आयोजित केले आहे. या कार्यक्रमासाठी संघटनेचे पदाधिकारी महानगर सचिव नवनाथ मंत्री, अशोक ढमढेरे, विनोद केनेकर, अनिल पाटील, योगेश खोसरे विलास चव्हाण विलास सहाने विलास भुतेकर बाळू पवार डॉ. पद्माकर पगार, रावसाहेब बोरसे, अजित जाधव, कृष्णा गोंडे, दिपक वाघ, पोपट आगवान,रामेश्वर गोराडे, रवींद्र मगर, संभाजी जाधव, सचिन मुसळे, सागर सूर्यवंशी, मानसी भागवत, अरुणा चौधरी, सविता हिंगे,शितल कवडे, सोनाली गव्हाणे, रेखा साकळे, स्वाती बोंडे आदी पदाधिकार्यांनी नियोजन केले आहे, तरी आपल्या मराठवाड्यातील सर्व शिक्षक बांधवानी या व्याख्यान मालेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाई चंद्रकांत चव्हाण यांनी केले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ नोव्हेंबर २०२५

# महात्मा फुले : सामाजिक क्रांतीचे शिल्पकार

भारतीय समाजाच्या इतिहासात 19व्या शतकाने एक मूलभूत परिवर्तनाची दिशा निश्चित केली आणि या परिवर्तनाच्या मध्यभागी महात्मा फुले हे व्यक्तिमत्त्व अग्रगण्य ठरले. जात, पंथ, लिंग आणि वर्ण यांच्या आधारे शतकानुशतके स्थिरावलेल्या असमानतेच्या प्रथांना त्यांनी विचारांच्या तलवारीने छेद दिला. त्यांचा दृष्टिकोन संघर्षाचा होता, परंतु तो संघर्ष द्वेषावर आधारित नव्हता; तो न्याय, विवेक आणि मानवतेवर आधारलेला होता. म्हणूनच जेथे वैर, शोषण, अन्याय आणि दमन होते तेथे त्यांनी समतेचे, शिक्षणाचे आणि स्वातंत्र्याचे विचार रुजविले. त्यांच्या समाजकार्याने भारतीय सामाजिक विचारसरणीला नवी दिशा दिली आणि भारतीय मानवमूल्यांच्या पुनर्रचनेसाठी ते एक प्रेरणादायी अध्याय ठरले. आज त्यांच्या स्मृतीदिनी त्यांचे कार्य समजणे म्हणजे फक्त इतिहास स्मरण करणे नव्हे, तर आजच्या सामाजिक वास्तवाच्या संदर्भात न्याय, समानता आणि मानवी हक्कांच्या दिशेने पुढे जात राहण्याची शिकवण घेणे होय.

महात्मा फुले यांचे जीवन पाहताना जाणवते की ते फक्त विचारवंत नव्हते; ते समाजाचे निरीक्षक, त्याचे विश्लेषक आणि परिवर्तनासाठी एकत्रित कृतीचा मार्ग सुचवणारे होते. बालवयातच त्यांच्या मनाला स्पर्शलेली जातिभेदाची वेदना पुढे त्यांच्या संपूर्ण कार्याची प्रेरणा ठरली. शिक्षणाची संधी मिळूनही समाजाच्या एका वर्गावर केवळ जातनिहाय शिक्षणाचा हक्क नाकारला जात होता, हे वास्तव त्यांना खूप बोचले. म्हणूनच त्यांनी पहिली लढाई शिक्षणाच्या क्षेत्रातून सुरू केली. स्त्रियांचे शिक्षण आणि बहुजन समाजाच्या मुलांसाठी शैक्षणिक दार खुले करणे हे त्यांच्या संघर्षाचे पहिले पाऊल होते. सन 1848 मध्ये पुण्यात त्यांनी आणि सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेली मुलींची पहिली शाळा हा भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा पहिला प्रकाशकिरण ठरला. शिक्षण ही फक्त माहिती मिळवण्याची पद्धत नसून विचार, स्वातंत्र्य आणि स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केले. स्त्रीला शिक्षण मिळाल्यास कुटुंब, समाज आणि पुढील पिढी सुशिक्षित होते, ही त्यांची दृष्टी आजही विकासाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आढळते.

त्यांच्या कार्यात सावित्रीबाई फुले यांचे स्थान अविभाज्य आहे. स्त्री शिक्षणात आणि सामाजिक आंदोलनात त्यांनी दिलेली साथ ही जगातील स्त्री मुक्ती चळवळींच्या इतिहासातील अद्वितीय घटना आहे. सावित्रीबाईंच्या पाठीशी उभे राहून त्यांना मार्ग दाखवणे, समाजाच्या दगडफेक-अपमान आणि मानसिक आघातासमोर दृढ राहण्याची प्रेरणा देणे हे महात्मा फुले यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी स्त्रीला फक्त शिक्षणापुरते मर्यादित न ठेवता तिला मानव म्हणून तिचे अधिकार दिले. त्याच काळात, जेव्हा स्त्रियांच्या माथ्यावर सतीप्रथा, बालविवाह, विधवांचे अमानुष जीवन आणि समाजाच्या कडेवर जगणे ही वास्तवता होती, तेव्हा फुले यांनी विवाहसंस्थेतील पुनर्रचनेची गरज मांडली. विधवांना पुन्हा विवाहाचे स्वातंत्र्य मिळावे आणि त्यांना समाजात सन्मानाने जीवन जगता यावे, यासाठी त्यांनी समाजसुधारणेची चळवळ उभी केली. विधवेस गर्भ असल्यास तिचे रक्षण व्हावे, समाजाने तिला आधार द्यावा, म्हणून त्यांनी 'बालहत्याप्रतिबंधक गृह' स्थापन केले. त्या काळात अशा विचारांची कल्पना करणे देखील समाजासाठी आघातक होते, परंतु फुले निर्धाराने या दिशेने उभे राहिले.

महात्मा फुले यांचा समाजदृष्टीत 'सत्यशोधक' दृष्टीकोन सर्वात महत्त्वाचा आहे. त्यांनी समाजातील देव, धर्म आणि परंपरांना प्रश्न विचारला: "हा धर्म मनुष्याला बांधून ठेवतो की मुक्त करतो?" त्यांच्या मते धर्म हा समतेवर आधारित असावा, निसर्गनियमांशी सुसंगत असावा आणि प्रत्येक व्यक्तीला मनुष्य म्हणून समान सन्मान मिळवून द्यावा, अन्यथा तो धर्म नसून अनीत्याची व्यवस्था असते. म्हणूनच त्यांनी 24 सप्टेंबर 1873 रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाने समाजातील जातीय असमानता, रूढी, अज्ञान, अंधश्रद्धा आणि विषमता यांना प्रत्युत्तर दिले. सत्यशोधक विवाहपद्धती समाजासाठी नवीन वळण ठरली. या विवाहात हुंडा, खर्चिक विधी किंवा ब्राह्मण पुरोहितांची आवश्यकता नव्हती. विवाहाचे आधारस्तंभ होते, त्यामध्ये समानता, संमती आणि मानवी मूल्ये, या विवाह व्यवस्थेने समाजातील शोषितांना पहिल्यांदा सन्मानाने विवाह करण्याचा अधिकार दिला.

शेतकरीवर्ग, कृषीव्यवस्था आणि सामाजिक-आर्थिक विषमता यांवर फुले यांनी केलेले चिंतन आजही आधुनिक समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमाचा आधार आहे. कृषीव्यवस्था, जमीनदारी, करप्रणाली आणि दलालपद्धती यांमधील विषमता त्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकाद्वारे स्पष्ट केली. शेतकरी हा अन्नदाता असूनही तो गुलामासारखे जीवन जगतो, हे त्यांनी निर्भीडपणे प्रतिपादन केले. शिक्षणाच्या माध्यमातून शेतकरी आणि बहुजन समाजाला आपण गुलाम का आहोत याचे भान निर्माण करणे हा त्यांचा केंद्रबिंदू होता. यामुळे समाजस्वातंत्र्य आणि आत्मभानाची प्रक्रिया सुरू झाली. त्यांनी सांगितले की "मनुष्याने मनुष्याला गुलाम मानणे ही पापाची पराकाष्ठा आहे आणि या पापातून मुक्त होण्यासाठी शिक्षण आणि संघटन हा मार्ग आहे."

भारतीय स्त्री-पुरुष, जात-पात, धार्मिक असमानता आणि आर्थिक शोषण यांच्या विरोधात फुल्यांनी केलेल्या संघर्षाचा विस्तार फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित नव्हता. त्यांची विचारधारा पुढे भारतातील सामाजिक न्याय, आरक्षण, स्त्री समता, धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि मानवाधिकारांच्या पाया ठरली. त्यांचे कार्य भारतातील दलित-बहुजन चळवळींचे आद्यस्रोत ठरले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, पेरियार रामासामी यांसारख्या महान कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे तत्त्वज्ञान त्यांच्याच कार्यातून उगम पावले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना आधुनिक भारतातील महान सामाजिक अभियंता मानले.

महात्मा फुले यांनी केलेल्या कार्याचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समाजाला केवळ विरोध दिला नाही, तर पर्यायी सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की समाजातील बदल विचारांपासून सुरू होऊन कृतीत उतरला पाहिजे. म्हणूनच त्यांचे प्रत्येक आंदोलन, प्रत्येक भाषण आणि प्रत्येक उपक्रम प्रत्यक्ष समाजपरिवर्तनाशी जोडलेला होता. त्यांच्या 'तृतीय रत्न', 'गुलामगिरी', 'सत्यशोधक समाज' आणि इतर लेखनात त्यांनी समतेचे नवीन तत्त्वज्ञान मांडले. "जोपर्यंत समाजात समानता नसते, तोपर्यंत स्वातंत्र्य निरर्थक आहे" हा त्यांचा मूलभूत संदेश आजही भारतीय संविधानाच्या आत्म्याशी जोडलेला आहे.

त्यांच्या जीवनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कोणालाही शत्रू मानले नाही; त्यांनी फक्त अन्याय, अज्ञान आणि जातीय नियंत्रण करणाऱ्या विचारांना शत्रू मानले. बुद्धी, विज्ञान आणि विवेकावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करणे हे त्यांचे स्वप्न होते. ते म्हणाले होते की "शिक्षणाशिवाय मनुष्य गुलाम बनतो आणि शिक्षणानेच मनुष्य स्वातंत्र्य मिळवतो." म्हणूनच त्यांनी शिक्षक म्हणून काम केले, मार्गदर्शक म्हणून प्रेरणा दिली आणि समाजकार्यासाठी स्वतःला वाहून घेतले. समाजाने नाकारले, हसले केले, विरोध केला; पण त्यांनी थांबणे, निराश होणे किंवा मागे हटणे हे कधी शिकले नाही.

आज महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे व्यक्तिमत्त्व पाहताना जाणवते की भारतीय समाजात आजही त्यांचे विचार अत्यंत आवश्यक आहेत. आजही स्त्री शिक्षणाची असमानता, जातीय भेद, आर्थिक असमानता, अंधश्रद्धा आणि सांस्कृतिक विषमता पुन्हा डोके वर काढताना दिसतात. म्हणूनच फुले यांचे कार्य आजचा मार्गदर्शक दीप आहे. समता, शिक्षण, स्वातंत्र्य, मानवी मूल्ये आणि सामाजिक न्याय ही त्यांची देणगी आहे. त्यांची कार्यप्रणाली व्यक्ती, समाज आणि शासन या तिन्ही स्तरांना प्रेरणा देते. त्यांचा संघर्ष आजच्या प्रगत भारतासाठी एक शक्तीगंध घेऊन उभा आहे.

महात्मा फुले यांच्या स्मृतीदिनी त्यांना अभिवादन करणे म्हणजे केवळ शब्दांचे गौरव नव्हे, तर त्यांच्या विचारांचे पुनर्स्थापन करण्याची गरज ओळखणे आणि त्या दिशेने पाऊल उचलणे होय. समाजातील दुर्लक्षित, वंचित आणि उपेक्षित वर्गासाठी त्यांनी पेटवलेला विचारप्रकाश आजही जिवंत आहे. त्यांच्या विचारातून अनेक पिढ्यांना मार्ग मिळतो, ऊर्जेचा स्रोत मिळतो आणि नवीन सामाजिक बदलांची बीजे तयार होतात. म्हणूनच महात्मा फुले हे केवळ व्यक्तिमत्त्व नसून समाजक्रांतीचे प्रतीक आहेत. त्यांचे जीवन हे संदेश देते की न्याय आणि मानवता जिंकते, अन्याय आणि विषमता कोसळते. ज्या ठिकाणी मनुष्याला मनुष्यत्वाची जाणीव होते तेथे महात्मा फुले यांच्या विचारांचा स्पर्श असतो.

आज आपण त्यांच्या कार्याचा विचार करतो तेव्हा समाजातील प्रत्येक क्षेत्रातून, शिक्षण, महिलांचे हक्क, धर्म, राजकारण, कृषि आणि सामाजिक न्याय त्यांचा प्रभाव दिसतो. ते सामाजिक क्रांतीचे शिल्पकार होते, मानवी मूल्यांचे संवाहक होते आणि आधुनिक भारतातील समतेच्या आंदोलनांचे अग्रदूत होते. म्हणून त्यांचे स्मरण ही केवळ एक दिनांकाची औपचारिकता नाही; तर ती एक चेतना आहे. आणि त्या चेतनेतूनच निर्माण होईल तो विचार म्हणजेच "मानवतेच्या आधारे उभा असलेला नवा समाज होय."

*महात्मा फुले यांना विनम्र अभिवादन.*



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
मो. 9960103582
bagate.rajendra५@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002